दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२९ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.७ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

## निवडणूक आयोगाचा निकाल

**मुंबई(वृत्तसंस्था)–राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली होती. त्यामुळे खरा पक्ष कोणता याबाबतचा निकाल निवडणूक आयोगाकडे होता. हा निकाल आता लागला असून अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचं निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे.**



जुलै महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीबरोबर जात उपमुख्यमंत्री पदाचा कारभार स्वीकारला. त्यांच्याबरोबर काही आमदारही गेले. तसंच, जवळपास ७ मंत्र्यांनी त्यांच्याबरोबर मंत्रिपदाची शपथही घेतली. शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादीतही फूट पडल्याने हे प्रकरणही निवडणूक आयोगाकडे गेले. गेल्या सहा महिन्यांपासून निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस फुटीचं प्रकरण प्रलंबित होतं. गेल्या सहा महिन्यांत याप्रकरणी १० सुनावण्या निवडणूक आयोगाकडे झाल्या. या प्रत्येक सुनावणीत शरद पवार जातीने हजर होते.अजित पवार गट आणि शरद पवार गटाकडून निवडणूक आगोयाने मागितलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. अखेर अजित पवार गटाला राष्ट्रवादीचं पक्षचिन्ह आणि पक्षनाव देण्यात आलं आहे. त्यामुळे आगामी राज्यसभा निवडणुकीत शरद पवार गटाला पक्षचिन्ह आणि पक्ष नावासाठी तीन पर्याय सुचवण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

**आमच्या महायुतीतील घटक पक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच घड्याळ चिन्ह म्हणून निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाली, मी त्यांचे, सर्व सहकारी तसेच कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

### निवडणूक आयोगाचा हा निर्णय धक्कादायक

“राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारांच्या हातातून पक्ष हिसकावून घेतला जातोय. देशातील जवळपास सर्वच संविधानिक संस्थांनी स्वायत्तता गमावली असल्याने तर्कहीन निर्णय देऊन तांत्रिक कारणे पुढे केली गेलेली सकृतदर्शनी दिसत आहे. या निकालाचा सविस्तर अभ्यास करुन आम्ही त्यावर भाष्य करू. या निकालाला आम्ही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असून देशाचे सर्वोच्च न्यायालय आम्हाला न्याय देईल याची आम्हाला खात्री आहे’, अशी प्रतिक्रिया जयंत पाटलांनी दिली.

### अदृश्य शक्तींचा हात

माध्यमांशी बोलत असताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, हा निर्णय आम्हाला अपेक्षित होता. जे शिवसेनेबरोबर केलं, तेच आमच्याबरोबर होईल. याची आम्हाला कल्पना होती. शरद पवार यांनी अनेकदा शून्यातून विश्व निर्माण केलं होतं. त्यांनी ६० व्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उभा केला. आता पुन्हा आम्ही पक्ष उभा करू. आता आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाऊ. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शरद पवार यांचाच आहे, हे पूर्ण देशाला माहीत आहे. पण काही अदृश्य शक्तींनी आमच्याकडून पक्ष काढून घेतला. **खा. सुप्रिया सुळे**

# दिल्लीच्या महिला संघाने पटकाविला कबड्डी स्पर्धेचा आमदार चषक,पूरुष गटात विठ्ठल क्रिडा मंडळ विजयी

## पुरस्कार वितरण कार्यक्रमाने कबड्डी स्पर्धेचा समारोप, आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमूख उपस्थिती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पेनतून आयोजित श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवा ला सुरवात करण्यात आली आहे. या महोत्सवा निमित्त जय श्रिराम क्रिडा मंडळ, चंद्रपूर च्या वतीने आयोजित कबड्डी स्पर्धेचा बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाने समारोप करण्यात आला आहे. यात दिल्लीच्या महिला संघाने आमदार चषक पटकाविला आहे तर पूरुष गटात विठ्ठल क्रिडा मंळड, चंद्रपूरचा संघ विजयी झाला आहे. विजयी संघाना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरित करण्यात आले.



यावेळी आमदार किशोर जोरगेवार, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शंडे, मधूरकर बनकर, भास्कर कावळे, शरद बनकर, अमीत लडके, ताहिर हुसेन, राम जंगम, अतुल बनकर, पिंटु गावतूरे, राजेश गुटके, किशोर रायपूरकर, मंगला आखरे, नकुल वासमवार, राशेद हुसेन, कार्तिक बोरेवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती. चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. बिनबा वार्ड येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेने या महोत्सवाला सुरवात करण्यात आली होती. तर २ फेब्रुवारी पासून भिवापूर येथील माता नगर येथे कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यात परभणी, वासीम, लातूर यासह राज्याबाहेरील दिल्लीच्या दोन महिला संघाने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत ४० संघ सहभागी झाले होते. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेचा बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाने समारोप करण्यात आला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांची प्रामूख्याने उपस्थिती होती. यावेळी झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात दिल्लीच्या संघाने बाजी मारली तर पुरुष खुल्या गटात विठ्ठल मंदिर क्रिडा मंडळ, चंद्रपूरचा संघ विजयी झाला. यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि, एक उत्तम आयोजन येथे करण्यात आले. यात दिल्लीच्या संघाने सहभाग घेतला हेच श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाचे यश आहे. या महोत्सवाला आपण चंद्रपूरची अराध्य दैवत माता महाकालीचे नाव दिले आहे. त्यामुळे आता या महोत्सवाच्या माध्यमातून मातेचा नावाचा जयघोष दिल्लीत पोहचला आहे. या भागाच्या विकासासाठी आपण कटिबध्द आहोत. येथील मंडळाने कबड्डी मॅटची मागणी केली आहे. ती मान्य आहे. क्रिडा क्षेत्रासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्याचा आमचा मानस असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# डब्ल्यूएसएफ चषक राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचां पुणे विजेता तर अहमदनगर उपविजेता



**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा,(डब्ल्यूएसएफ)व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा व्हॉलीबॉल अजिंक्यपद पुरुष गटातील पुणे जिल्हा संघाने अहमदनगर जिल्हा संघावर चुरशीच्या लढतीत तीन ३-१ अशा सेटसनी पराभव करीत अजिंक्यपद मिळविले. तर अहमदनगर संघाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. तृतीय स्थानाकरीता झालेल्या सामन्यात गोंदिया जिल्हा संघाने अमरावती जिल्हा संघाचा पराभव करीत तृतीय स्थान पटकाविले. या स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू पुणे संघाचा साईराज बांदल ठरला.

स्पर्धेचे बक्षीस वितरण लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील यांच्या हस्ते झाले तर यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख ,डॉ.विजय देवतळे, वरोरा उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांनी स्पर्धेला सदिच्छा भेट दिली.स्पर्धेच्या दरम्यान पत्रकार , पंच व पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वरोरा शहराचे माजी नगराध्यक्ष विलास टिपले, राजेंद्र चिकटे, विलास नेरकर, प्रा विश्वनाथ जोशी, मुनाज शेख, नरेंद्र नेमाडे, डॉ हेमंत खापणे उपस्थित होते.स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी खेळाडूंचा सत्कार सुवर्णरेखा पाटील यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मंचावर करण देवतळे, अमोल मुथा, जयंत टेमुर्डे, समीर बारई, संवर्ग विकास अधिकारी गजानन मुंडकर , संजय आंबुलकर, राहुल राखे, सुनीता उरकांडे, कल्पना देशपांडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.स्पर्धा यशस्वी करण्याकरिता महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रतीक पाटील व सचिव विरल शहा यांच्या मार्गदर्शनात वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा व लोक शिक्षण संस्था वरोडा यांनी अथक परिश्रम घेतले.

# शूरवी महिला महाविद्यालय मूल येथील विद्यार्थिनीचे सुयश



**मूल । प्रतिनिधी**

विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय बेंबाळ येथे राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करून सध्या संपूर्ण देशात वादाचा विषय ठरलेल्या इव्हीइम ला अनुसरून भारतीय निवडणूक प्रक्रियेत इव्हीइम प्रदर्शक भूमिका बजावते. होय किंवा नाही या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सिद्धी माधव अलोनी आणी गौरी संजय शेरकी या बीएससी च्या विद्यार्थिनींनी स्पर्धेत भाग घेत शूरवी महिला महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. दोन्ही विद्यार्थिनींनी वादविवाद स्पर्धेत प्रभावीपणे आपली बाजू मांडली. यामध्ये सिध्दी आलोनी प्रथम वर्ष हिने होय च्या बाजूने बोलतांना द्वितीय क्रमांक पटकावला.तिला प्रमाणपत्र नगदी रक्कम व ट्रॉफी देऊन मान्यवराचे हस्ते पुरस्कार देण्यात आला.तिच्या यशाबद्दल श्री माता कन्यका सेवा संस्थेचे अध्यक्ष कापर्तीवार व सचिव सुरावार ,महाविद्यालयच्या प्राचार्या हर्षा खरासे आणी महाविद्यालयच्या सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व महाविद्यालयच्या विद्यार्थिनींनी सिद्धीच्या यशाबद्दल तिला शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# सुदर्शन समाज बांधवांसह प्रभू रामचंद्रांचे पुजन, प्रसाद वितरण व महाप्रसादाचा अभिनव कार्यक्रम

## हंसराज अहीर यांच्या शुभहस्ते सुदर्शन समाजातील ज्येष्ठ नागरीकांचा सत्कार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अयोध्येत प्रभु श्रीरामललांचे दर्शन घेतल्यानंतर या पुण्य, पवित्र नगरीतून आणलेल्या प्रसादाचे व प्रभु रामजींच्या मुर्तीचे धार्मिक मंत्रोच्चारात पूजन करून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी रामललांच्या चरणी श्रध्दासुमने अर्पित केली.



स्थानिक दादमहल वार्डातील महर्षी सुदर्शन महाराज व वाल्मिकी ऋर्षीच्या मंदीरात दि. ०५ फेब्रुवारी २०२४ रोजी सुदर्शन समाज बांधव व भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने पवित्र प्रसाद व रामललांच्या मुर्तीचे पुजन आयोजित करण्यात आले होते. या धार्मिक उत्सवास सर्वस्वी विजय राऊत, खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, राजेश मुन, अंजली घोटेकर, सुदर्शन समाज अध्यक्ष दिलीप हजारे, रमेश भूते, रवी गुरुनुले, ॲड. आषिश मुंधडा, राजु अडपेवार, विनोद शेरकी, राजू घरोटे, दिनकर सोमलकर, मनिषा महातव, वंदना संतोषवार, पं. मयूराप्रसाद पांडे, बळीराम महातव, चंद्रशेखर मलीक, आनंद मलीक आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी सुदर्शन समाजातील ज्येष्ठ महिला व पुरुषांचा हंसराज अहीर यांनी शाल व श्रीफळ देवून सन्मान केला. या प्रसादपुजन कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास राजू राठोड, मुन्ना मलिक, देवीदास हजारे, संजय निरके, गणेश मारवे, सुनिल महातव, राज बिरीया, अरविंद बकसरीया, मोनो मलिक, प्रल्हाद हजारे, बादल मलिक, करण मलिक, अमित राठोड, राकेश हजारे, तिलक सिकलवार, श्याम व्यास, ब्रिजेश हजारे, राजेश हजारे, मुकेश हजारे, सचिन हजारे, राज हजारे, रामू मतेलकर, शांता मलिक, कमलाबाई मलिक, रजनी हजारे, गंगाबाई हजारे, बबली मतेल, अनिता शिरके, शैलेष इंगोले, रवी चहारे, प्रदिप किरमे, गणेश गेडाम, प्रमोद शास्त्रकार, राजेंद्र खांडेकर, चंद्रकला सोयाम, वंदना जांभूळकर, शितल आत्राम, ॲड. सुरेश तालेवार, विठ्ठल डुकरे, बाळू कोतपल्लीवार, ॲड. हरीष मंचलवार, रेणुका घोडेस्वार, शालू कन्नोजवार, मुग्धा खांडे, नकुल आचार्य, श्याम बोबडे, मधुकर राऊत, सुभाष आदमने, प्रसाद काटपाताल, शेंद्रे, सुरज खोटे, राहूल मारवे, भिम मलिक, अमित राठोड, विजेश हजारे, राकेश हजारे, यांचेसह सुदर्शन समाज बांधव व भाजप पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मोनीषा महातव यांनी केले

# रमाईंच्या कोवळ्या मनावर प्रचंड आघात!

**_विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात– रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता. ही प्रेरणादायी माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक यांच्या शब्दांत...**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या– या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात– अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात– रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे– वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ– शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा



मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन–चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात– आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात– हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे दु:खद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

**श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक.**
**(भारतीय थोरपुरुषांचे जीवनचरित्र अभ्यासक)**
**गडचिरोली, भ्रमणध्वनी– ७७७५०४१०८६.**

# तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा ९ वर्षाची व भीमराव १४ वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळया मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगतण नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दु:खाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते, हे आपणांस रमाईत आढळते.

भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई !
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई
भीम जरी जगी ओळख भारताची
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी–थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, १९१४ ते १९१७ दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व १९२६ मध्ये राजरत्नदचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नीय शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नौ जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई!

बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोली मध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दु:ख सोसावेना. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला, मन गहिवरुन आलं. सगळी लहान मुले रमाबाई यांना रमाआई म्हणून नाचू बागडू लागली. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळ्यांची आई झाली.


ख्यातनाम गायक, मिलिंद शिंदे म्हणतात,
भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी,
बांगड्या सोन्याच्या रमानं दिल्या काढुनी.. धन्य रमाई ।
धन्य रमाई ।

अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८–१८ तास अभ्यायस करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या. निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत करत होती. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुध्दा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यां ना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी दिसताच, बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली, ते जवळ गेले. त्यांनी विचारले, रामू ! तू लांब का उभी राहीलीस' ? रमाई म्हबणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतूर झाला असतांना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नव्हते, म्हणुन तर मी अशी लांब उभी आहे, शेवटी, मी तर तूमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते. रमाईंनी अठ्ठावीस वर्षे बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावार त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा. असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवं मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचं रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई !

रमाईचं शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेलं होतं, रमाईचा आजार बळावला होता. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होतं. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाई कडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंताबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी २ वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावुली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या त्यामुळे बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईवर निस्सीम प्रेम होते. तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली– जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. आजच्या दिनी माता करुणामूर्ती रमाईच्या १३६ व्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन !





**प्रविण बागडे**
**जरीपटका, नागपूर – १४**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## रोटरीच्या व्यवसाय सेवा पुरस्कारांचे वितरण : किशोर पंदीलवार यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान




**उदगीर** –उदगीर येथे रोटरीच्या सेवेचा सूर्य कधीच मावळत नाही असे प्रतिपादन प्रांतपाल स्वाती हेरकळ यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने देण्यात येणारा व्यवसाय सेवा पुरस्कार २०२३–२४ चे वितरण रोटरी जिल्हा ३१३२ च्या प्रांतपाल स्वाती हेरकळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर सहायक प्रांतपाल शशिकांत मोरलावार, जिल्हा सचिव प्रमोद शिंदे, उदगीर रोटरीच्या अध्यक्षा मंगला विश्वनाथे, सचिव सरस्वती चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे संस्थापक अध्यक्ष किशोर पंदीलवार यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजात विविध वेगवेगळ्या क्षेत्रात आपला व्यवसाय सचोटीने, प्रमाणिकपणे व सामाजिक जबाबदारीने व्यवसाय करणारे अँड. विश्वनाथ अंकुलगे, डॉ. भिकमचंद सोनी, कालिदास जाधव, कंचन चिखलिया, राजकुमार शिकलपुरे आदींचा सत्कार शाल व सन्मानपत्र देऊन करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना प्रांतपाल स्वाती हेरकळ यांनी, रोटरीच्या वतीने अनेक सामाजिक कार्य केली जातात त्यापैकी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत कार्य करणाऱ्या या व्यावसायिकांचा सन्मान करणे म्हणजेच समाजातील सर्व घटकांचा सन्मान असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोजेक्ट चेअरमन अँड. विक्रम संकाये यांनी केले. सुत्रसंचालन विशाल जैन यांनी केले. आभार रवींद्र हसरगुंडे यांनी मानले. कार्यक्रमास प्रशांत मांगुळकर, संतोष फुलारी, महानंदा सोनटक्के, विशाल तोंडचिरकर, कीर्ती कांबळे, विजयकुमार पारसेवार, ज्योती चौधरी, व्यंकटराव कणसे, चंद्रकांत ममदापुरे, अनिल मुळे, सुनीता मदनुरे, सुनीता चवळे, सुधीर जाधव, विद्या पांढरे, डॉ. सुलोचना येरोळकर, आशीष अंबरखाने, बजरंग चंदनशीवे, डॉ. संतोष पांचाळ, पवन मुत्तेपवार सह रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष तेजस अंबेसंगे, सचिव शशांक चौधरी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## अनेक शाळांमध्ये शालेय समिति व्यवस्थापन समिती नावालाच




**कोसगाव । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील कोसगांव येथे शाळेची गुणवत्ता वाढावी शिक्षक विद्यार्थी तसेच व्यवस्थापन समिती या त्रिसूत्रीवर शाळेचा विकास होण्याच्या दृष्टीने शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येते. मुलांच्या शिक्षणाविषयी निराकरण करणे शिक्षकांवर देखील लक्ष ठेवणे, शाळा विकासासाठी योग्य ते मार्गदर्शन करणे , शाळेला आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून मदत करणे, यासारखी अनेक प्रकारची कामे ही समिती बघत असते. या समितीवर विद्यार्थी पालक यांची निवड करण्यात येते. यामध्ये शालेय समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्य यांचा समावेश करण्यात येतो. बिनविरोध तसेच निवडणूक घेऊन या समित्यांची निवड करण्यात येते. तर काही ठिकाणी राजकारणी लोक ही निवडणूक प्रतिष्ठेची करतात. या निवडीसाठी पैशाचा वापर काही ठिकाणी करण्यात येतो. शालेय पोषण आहाराची चव घेऊन आपला अभिप्राय नोंदवीला जात असतो.परंतु एकही शालेय व्यवस्थापन समितीचा सदस्य शाळेत येऊन पोषण आहाराची चव घेऊन अभिप्राय नोंदवीतांना दिसत नाही.व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा सदस्य शाळेत कधीच दिसून येत नाही. समितीच्या अध्यक्षांना सदस्यांना शाळेमध्ये एखादी चक्कर मारायला वेळ राहिला नसून फक्त नामधारी तोरा मिरवतांना हे लोक दिसून येत असल्याची स्थानिक नागरिकांची प्रतिक्रिया बघायला मिळत आहे.बऱ्याच ठिकाणी शिक्षणासंबंधी मोठ्या प्रमाणावर समस्या असतात. काही ठिकाणी शिक्षक शिकवत नाही. शिक्षक हे वेळेवर हजर राहत नाही. अशावेळी त्यांना जाब विचारणे शालेय समितीचे अध्यक्ष यांचे कर्तव्य असते. कार्यक्रमात हजेरी लावायची आणि मोठेपणाचा आव आणायचा अशाच प्रकारचा कार्यक्रम सध्या या समितीने चालवला आहे. अध्यक्ष सोडला तर समिती सदस्यांचा कार्यकाळ कधी सुरू होतो आणि केंव्हा संपतो हेही कळत नाही. त्यामुळे सध्या शालेय व्यवस्थापन समित्या कागदावरच राहिल्या असल्याच्या प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिल्या आहेत..

# अजित पवारांनी लोकसभेचे रणसिंग फुंकले

## लोकसभेला भावनिक आवाहन केल तरी समोर अजित पवारच उमेदवार आहे असे समजून मतदान करा : उपमुख्यमंत्री पवार



**बारामती–** आजवर बारामतीत मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. या कामांची पावती म्हणून येत्या लोकसभा निवडणुकीत माझ्या उमेदवाराला निवडून द्या असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. या लोकसभेला तुम्हाला भावनिक आवाहन केलं जाईल, मात्र समोर अजित पवारच उमेदवार आहे असं समजून मतदान करा आणि आपल्या बारामतीतील विकास अखंडीतपणे साधण्यासाठी साथ द्या असं सांगत अजित पवारांनी लोकसभा निवडणुकीचं रणशिंग फुंकलं आहे.

बारामती शहरातील देसाई इस्टेट येथे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते विशाल जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा आज पार पडला. यावेळी बोलताना अजितदादांनी लोकसभेचा उमेदवार लवकरच जाहीर करणार असल्याची माहिती दिली. तसेच आगामी काळात आपल्या बारामतीच्या विकासाची प्रक्रिया निरंतर ठेवण्यासाठी अजित पवारच उमेदवार आहे असं समजून मतदान करा असं आवाहन त्यांनी केलं.येत्या लोकसभा निवडणुकीत ही शेवटचीच निवडणूक असं म्हणून मतदारांना भावनिक करण्याचा प्रयत्न होईल. मात्र तुम्ही भावनिक होऊ नका. आपल्या बारामतीत आज अनेक कामे सुरू आहेत. ही विकासाची प्रक्रिया निरंतर ठेवण्यासाठी मी दिलेल्या उमेदवाराला निवडून द्या असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. मी आजवर केलेल्या कामाची पावती म्हणून लोकसभेला माझ्या उमेदवाराला साथ द्या असं सांगत अजित पवार यांनी लवकरच उमेदवार कोण असेल याची घोषणा करणार असल्याचे जाहीर केले.

**लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना एका कार्यकर्त्याने वहिनीसाहेबांची उमेदवारी जाहीर करा असा आग्रह केला. एवढ्यावरच न थांबता दादा, तुम्ही आताच सगळ्यांसमोर उमेदवार जाहीर करा अशी विनंती केली. त्यावर ह्याला म्हणतात बारामतीकर असं म्हणत अजितदादांनी या कार्यकर्त्याला दाद दिली.**

## उदनवाडी चे सुपुत्र अशोक आलदर यांना जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार

**सांगोला | प्रतिनिधी**

उदनवाडी तालुका सांगोला येथील सुपुत्र श्री अशोक आलदर यांना नुकताच श्री स्वामी समर्थ जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे

राज्यातून अनेक प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यामधुन समितीने २२ जणांचे जीवन गौरव पुरस्कार साठी शिफारस केली होती श्री अशोक आलदर हे महावितरण मध्ये नोकरी करत असून त्यामध्ये श्री अशोक आलदर यांचे सामाजिक कार्य पाहता त्यांना या अगोदरही महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कर्मचारी पुरस्कार व महाराष्ट्रातील अनेक संस्थांचे वेगवेगळे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत




तसेच महाराष्ट्रातील अनेक संघटनांच्या पदावरतीही कार्यरत आहेत त्यांचे कार्य पाहता आताही त्यांना स्वामी समर्थ जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सांगोला तालुक्याचे आमदार मा शहाजी बापू पाटील दामाजी कारखान्याचे चेअरमन मा शिवानंद पाटील सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मा सौ जयमालाताई गायकवाड व पंढरपूरचे युवा नेते प्रवण मुखर्जी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला

यावेळी सोलापूर जिल्हा परिषदचे माजी शिक्षणाधिकारी मा जितेंद्र खंडाळे साहेब प्राध्यापक नाथाजी चौगुले नगरसेवक गुरुदास अभ्यंकर तसेच स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुवर्णाताई खंडागळे सचिव मा संकेत खंडागळे इत्यादी उपस्थित होते.

## वेळ बदलते, कुणालाही सोडणार नाही ; उद्धव ठाकरे यांचा अधिकाऱ्यांना इशारा,पंतप्रधान मोदी आमचे शत्रू नसल्याचा दावा

**राजापूर–**विरोधी पक्षांच्या नेत्यांविरोधात तक्रार करून अडचणीत आणणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निर्वाणीचा इशारा दिला आहे. आमच्या राजन साळवी यांच्या विरोधात कुणी तक्रार केली? काय मिळाले त्यांना? सत्ता येते आणि जाते. वेळही बदलते. आम्ही कुणालाही सोडणार नाही, असे उद्धव ठाकरे अधिकाऱ्यांना दम देताना म्हणाले.उद्धव ठाकरे सध्या कोकणाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी सोमवारी धूत पापेश्वर मंदिरात जाऊन सपत्नीक दर्शन घेतले. त्यानंतर मंदिर परिसरात सुरू असणाऱ्या विकासकामांचीही पाहणी केली. त्यानंतर राजापूर येथे आयोजित सभेत ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्यावरील ईडी कारवाईवरून सत्ताधारी आणि सरकारी अधिकाऱ्यांवर चांगलेच टीकास्त्र डागले. ते म्हणाले की, राजन साळवी यांच्याविरोधात कुणी तक्रार केली? काय



मिळाले तुम्हाला? सत्ता येते आणि जाते. अधिकाऱ्यांना सांगतो, वेळ बदलते. मी कुणालाही सोडणार नाही. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना राजन साळवी यांच्या विरोधातील पैसे वाटणाऱ्या उमेदवारावर कारवाई करण्याचेही आव्हान दिले.उद्धव ठाकरे यांनी यावेळी एसीबीने राजन साळवी यांच्या घरातील सामनाच्या लावलेली किंमतही वाचून दाखवली. या यादीवर सावंत नामक व्यक्तीची स्वाक्षरी आहे. ते म्हणाले की, मी राजन साळवी यांना धन्यवाद द्यायला आलो आहे. सुशांत चव्हाण तुम्ही महाराजांच्या मूर्तीची किंमत केली. किती तर ५ हजार रुपये. बाळासाहेबांचा फोटो व खुर्ची याची किंमत १० हजार रुपये. माझ्या वडिलांची किंमत मिंध्याना कळली, पण तुम्हाला नाही कळली. सर्वांचे दिवस फिरतात हे लक्षात ठेवा आता त्यांचे दिवस आहेत. उद्या आमचे येतील. तुमच्या ७ पिढ्या आल्या तरी या वस्तुंची किंमत तुम्हाला करता येणार नाही. मिंध्यांना त्यांच्या वडिलांची किंमत कळली नाही. त्यामुळे त्यांनी माझा बाप चोरला आहे, असे ते म्हणाले.तत्पूर्वी, सावंतवाडी येथील एका सभेत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले शत्रू नसल्याचे स्पष्ट केले होते. मोदी आमचे शत्रू नाहीत. आम्ही नेहमीच त्यांच्यासोबत होतो. आमचा विरोध हुकूमशाहीला आहे. हुकूमशाहीचा आपल्या सर्वांना एकत्र येऊन मुकाबला करावा लागेल, असे ते म्हणाले होते.

## आपुलकीच्या निवेदनाची तात्काळ दखल मुख्याधिकाऱ्यांकडून 'त्या' धोकादायक विहीरीची पाहणी

**सांगोला | प्रतिनिधी**

कुंभार गल्लीतील 'त्या' धोकादायक विहिरीला संरक्षक जाळी बसवावी तसेच विहिरीतील गाळ काढून आगामी उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई काळात कुंभार गल्लीतील नागरिकांना या विहिरीचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आपुलकीच्या वतीने निवेदनाद्वारे केल्यानंतर मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी तात्काळ विहिर परिसरात भेट देऊन पाहणी करून योग्य त्या उपाय योजना करण्याचे आश्वासन दिले.

कुंभार गल्लीत असलेल्या धोकादायक विहिरीत २ फेब्रुवारी रोजी अडीच वर्षाचा मुलगा पडला होता त्यास वाचवण्यात यश आले, मात्र भविष्यात अशा दुर्घटना घडू नये म्हणून या विहिरीला संरक्षण जाळी बसवण्याची मागणी आपुलकी प्रतिष्ठानकडून सोमवारी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. त्याची तात्काळ दखल घेत मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी आपल्या संबंधित अधिकाऱ्यांसह सोमवारी दुपारी या विहीर परिसराला भेट देऊन पाहणी केली आणि योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी नगरपालिका बांधकाम विभाग अभियंता आकाश करे, स्वच्छता निरीक्षक विनोद सर्वगोड, सोहेल नाईक, सोमनाथ बनसोडे आदिसह आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, विकास देशपांडे, दिपक शिनगारे, दादा खडतरे, उमेश चांडोले, अमर कुलकर्णी, संदीप पाटणे आदी सदस्य उपस्थित होते. निवेदनाची तात्काळ दखल घेतल्याबद्दल आपुपकीच्या सदस्यांनी मुख्याधिकाऱ्यांचे आभार मानले.





## स्वावलंबी होण्यासाठी कौशल्याला महत्त्व विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणापेक्षा कौशल्यावर आधारित शिक्षण घ्याव-दिलीप वळसे

**पुणे–**रोजगार मिळविण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी कौशल्याला महत्व असून विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणापेक्षा कौशल्यावर आधारित शिक्षण घ्यावे, असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सोमवारी केले.आंबेगाव तालुका विद्या विकास संचलित बी.डी काळे महाविद्यालय, घोडेगाव येथील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त अभिमन्यू काळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड, गट विकास आधिकारी प्रमिला वाळुंज, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष तुकाराम काळे, उपाध्यक्ष शाम होनराव,जयसिंगराव काळे, चेअरमन अँड मुकुंद काळे, कॉलेजचे प्राचार्य ज्ञानेश्वर वाल्हेकर, कवी प्रसाद कुलकर्णी आदी उपस्थित होते.वळसे पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतःमधील गुणांचा शोध घेऊन आपल्या करिअरची दिशा निश्चित करावी. आपल्यातील सुप्त कौशल्य अगोदरच ओळखणे गरजेचे आहे. आज विविध क्षेत्रात कौशल्याला महत्व प्राप्त झाल्याने. पारंपरिक शिक्षणापेक्षा कौशल्यावर आधारित शिक्षण अंगीकारणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांना कोणते शिक्षण घ्यावे याची सक्ती करु नये. विद्यार्थ्यांची आवड आणि त्यांचे कौशल्य विचारात घेऊन त्यांना करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. याबाबत विद्यार्थ्यांचे शाळेत आणि घरी समुपदेशन करावे. विद्यार्थांना सक्ती न करता त्यांना आवडीचे क्षेत्र निवडण्याची संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.महाविद्यालयाच्या कामगिरीचे कौतुक करून वळसे पाटील म्हणाले, आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ या संस्थेची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहाय्यभूत ठरत आहे. महाविद्यालयांने चांगल्या वक्त्यांना निमंत्रित करावे. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विविध विषयांचे मार्गदर्शन मिळेल, असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील वेगवेगळ्या क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

# जलसंधारणाची कामे करुन मतदार संघात हरित क्रांती केली-ना.बनसोडे

## ११ कोल्हापुरी बंधाऱ्यामुळे ४५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

**उदगीर–**आपला भाग हा दुष्काळी असल्याने या भागात पाण्याचे प्रमाण कमी होते. या भागाचा अभ्यास करुन एक मास्टर प्लॉन तयार केला. या परिसरात मागील ४० वर्षापूर्वी बंधारे झाले होते. त्याची अतिशय दुरावस्था झाल्याने या भागातील शेतक–यांना त्याचा फायदा होत नव्हता हि बाब लक्षात आल्यानंतर उदगीर तालुक्यातील कासराळ – ३, सुमठाणा – २ , वाघदरी – २, टाकळी – २, कौळखेड – १ , चांदेगाव – १ असे एकुण ११ कोल्हापुरी बंधारे मंजूर करुन घेतले त्यात आरनाळ येथील एका साठवण तलावाचाही समावेश आहे १ साठवण तलाव व ११ कोल्हापुरी बंधाऱ्यासाठी एकुण ३० कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला आहे. या बंधाऱ्यामुळे उदगीर तालुक्यातील ४५० हेक्टर क्षेत्र हे सिंचनाखाली येणार असुन या भागातील पाणीटंचाई ही कमी होणार आहे. या कोल्हापुरी बंधाऱ्यांमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती होवुन त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणून जलसंधारणाची कामे करुन मतदार संघात हरित क्रांती केली असल्याचे मत क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.



ते मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने आयोजीत उदगीर तालुक्यातील मौजे कासराळ येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या भुमीपुजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार रामेश्वर गोरे, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, महावितरणचे सायस दराडे, वाढवणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.एस. गायकवाड, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल कांबळे, कासराळचे सरपंच दयासागर यल्लावाड, ज्ञानोबा शेळके, सुरेखा पाटील, भरत चामले, ब्रम्हाजी केंद्रे, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, सय्यद जानीमियाँ, फय्याज शेख, इब्राहिम पटेल, बाळासाहेब मरलापल्ले, नवनाथ गायकवाड, शशिकांत बनसोडे, नागेश थोंटे, संजय पवार, बालाजी भोसले, बस्वराज रोडगे, प्रशांत चामे, प्रभाकर पाटील, वसंत पाटील आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मतदार संघात नागरीकांना लागणा–या सर्व सुख – सुविधा उपलब्ध करुन देवुन उदगीरच्या विकासाचा नवा पॅटर्न महाराष्ट्रात निर्माण केला. आणखी नविन ७ कोल्हापुरी बंधारे मंजूर केले असुन यामध्ये धडकनाळ – २ , बोरगाव – १, लिंबगाव – १ देवर्जन – १ नळगीर – १, नागलगाव – १ असा एकुण ७ कोल्हापुरी बंधाऱ्यांसाठी १० कोटी ६९ लक्ष रुपये मंजूर केले असुन त्याची निविदा प्रक्रिया चालु आहे. लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचेही ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.मतदार संघात जलसंपदा विभागातुन सिंचनाचे प्रश्न सोडवले आहेत. त्यामध्ये आजपर्यंत ६० कोटींची कामे झाली असुन१४२ कोटींची कामे अजुन प्रस्तावित आहेत. मंजूर झालेली सर्व कामे वेळेत व दर्जेदार करण्याचे निर्देश ही ना.बनसोडे यांनी दिले.गाव समृध्द झाले तर तालुका समृध्द व जिल्हा मग महाराष्ट्र राज्य त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येवून आपल्या भागाचा विकास करावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्याम डावळे यांनी केले तर आभार गोपाळ पाटील यांनी मानले.यावेळी नागलगाव, टाकळी, चांदेगाव, लिंबगाव, वागदरी, धडकनाळ, बोरगावसह परिसरातील ग्रामस्थ व प्रतिष्ठित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्नेह मिलन सोहळ्यातून विविध विषयातील मार्गदर्शनाची संधी-डॉ.विजय देवतळे

**भद्रावती । प्रतिनिधी**

माजी विद्यार्थी आणि त्यांना शिक्षण देणारे तत्कालीन गुरूजन यांनी त्यांच्या सेवा कालावधीत विविध अनुभव संपादित केलेले असते. स्नेह मिलन सोहळयात माजी विद्यार्थी आणि त्यांचे तत्कालीन गुरुजन उपस्थित राहात असल्याने त्यांच्याकडील अनुभव व ज्ञान यातून विविध विषयातील मार्गदर्शनाची संधी कार्यरत शिक्षक व विद्यार्थांना मिळत असते. असे प्रतिपादन ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ वरोराचे अध्यक्ष डॉ. विजय देवतळे यांनी केले.

तालुक्यातील जेना येथील कर्मवीर विद्यालयात वर्ग १०वीचे माजी विद्यार्थी ( सत्र१९७९-८० ) यांनी नुकत्याच आयोजित केलेल्या स्नेहमिलन सोहळ्याचे उद्घाटक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ वरोराचे अध्यक्ष डॉ. विजय देवतळे बोलत होते.

याप्रसंगी व्यासपिठावर सोहळ्याचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यीक तथा राज्य पुरस्कार प्राप्त सेवा निवृत्त मुख्याध्यापक आचार्य ना.गो. थुटे , सोहळ्याचे उद्घाटक डॉ. विजय देवतळे, प्रमुख मार्गदर्शक आ. नि. महाविद्यालयातील से. नि. मराठी विभाग प्रमुख प्रा. श्रीकांत पाटील, तत्कालीन गुरूजन तथा सत्कार मुर्ती पुंडलीक नन्नावरे, विठ्ठल रोडे आणि मारोतराव खिरटकर , प्रमुख अतिथी ग्रा. शि. प्र. मंडळाचे सचिव गोपाळराव एकरे, सदस्य रामदास डहाळकर,दिनकरराव ठेंगणे व उत्तमराव झाडे, से. नि. मुख्याध्यापक मदनराव ठेंगणे आणि क. वि.जेनाचे मुख्याध्यापक सुनिल लेडांगे प्रामुख्याने उपस्थित होते.दिप प्रज्वलन आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पन करून सोहळयाचे उद्घाटन करण्यात आले. सु.वि. साठे आणि संच यांनी आचार्य ना.गो. थुटे यांनी रचलेले सुमधूर स्वागत गीत सादर केले.सोहळ्याचे उद्घाटक डॉ. विजय देवतळे यांनी स्नेह मिलन सोहळा आयोजीत केल्या बद्दल माजी विद्यार्थांची भरभरुन प्रशंसा केली.




## जेना परीसरातील एक अविस्मरणीय सोहळा : आचार्य ना.गो. थुटे

जेना गावासह परीसरातील बहुतांश गावांनी या सोहळ्यात सहभाग दर्शविला. वरोरा - भद्रावती महामार्गावरील किलोनी गावापासून थेट जेना गावापर्यंत या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या मंडळींचे स्वागत करण्यासाठी स्वागत फलक झळकले, या निमित्माने जेना गावाला उत्सवाचे स्वरूप आले. गावात सुध्दा स्वागत फलक लावण्यात आले. रांगोळ्या टाकूण मार्ग सुशोभीत करण्यात आले. भव्य स्वागत रॅली काढण्यात आली. हा स्नेह मिलन सोहळा सर्वांसाठी एक अविस्मरणीय व प्रेरणादायी क्षण ठरल्याचे प्रतिपादन सोहळ्याचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यीक तथा राज्य पुरस्कार प्राप्त सेवा निवृत्त मुख्याध्यापक आचार्य ना.गो. थुटे यांनी या प्रसंगी केले.

तब्बल त्रेचाळीस वर्षानंतर सर्व वर्ग मित्र परीवारांसह एकत्रीत आले. सदर स्नेह मिलन सोहळा सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला असून ग्रा. शि. प्र. मंडळाद्वारा संचालित प्रत्येक विद्यालयात अश्या प्रकारे स्नेह मिलन सोहळे आयोजित करावे. असे आवाहन केले.याप्रसंगी तत्कालीन गुरूजन तथा सत्कार मुर्ती पुंडलीक नन्नावरे, विठ्ठल रोडे आणि मारोतराव खिरटकर , व्यासपिठावरील सर्व मान्यवर यांच्यासह, तत्कालीन शिक्षक पुरुषोत्तम तामगाडगे व जनार्धन कांबळे, तत्कालीन कर्मचारी प्रेमदास पुनवटकर,तत्कालीन जि.प. शाळा मुख्याध्यापक माधवराव दोडके व उत्तमराव झाडे, संगीत कला मंचचे सु.वि. साठे आणि संच यांचा शाल, श्रीफळ , सन्मान चिन्ह व पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदाना बद्दल अनुक्रमे प्रा. धनराज आस्वले ,रवींद्र शिंदे आणि नरेंद्र पढाल यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला.मान्यवरांच्या शुभहस्ते सर्वच माजी विद्यार्थांचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.याप्रसंगी तत्कालीन गुरूजन तथा सत्कार मुर्ती पुंडलीक नन्नावरे, विठ्ठल रोडे आणि मारोतराव खिरटकर यांनी माजी विद्यार्थांनी आयोजित केलेल्या स्नेह मिलन सोहळयाचे कौतुक केले. या प्रसंगातुन आम्हाला जगण्याची नवी उमेद मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रमुख अतिथी ग्रा. शि. प्र. मंडळाचे सचिव गोपाळराव एकरे, सदस्य रामदास डहाळकर, दिनकरराव ठेंगणे आणि उत्तमराव झाडे यांनी समयोचित मार्गदर्शन करीत स्नेह मिलन सोहळा आयोजना संबंधी प्रसन्नता व्यक्त केली. या सोहळ्यात सहकुटूंब माजी विद्यार्थी, विविध शाळांचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि शिक्षक, विविध क्षेत्रातील मान्यवर, गावातील व परीसरातील जेष्ठ नागरिक , सामाजिक कार्यकर्ते फार मोठ्या संख्येत सहभागी झाले. सोहळ्याचे सुत्रसंचलन प्रभाकर वाघ, प्रास्ताविक सुर्यभान पिंपळकर आणि आभार प्रदर्शन पोमेश्वर टोंगे यांनी केले.

## माजी विद्यार्थांनी आपल्या शाळा समृध्द कराव्या : प्रा श्रीकांत पाटील

शिक्षकी पेशा हा भाग्यवान व श्रीमंत पेशा आहे. शैक्षणिक जिवनात निर्णायक ठरलेल्या आपल्या शाळा सध्य स्थितीत कुठल्या अडचणीत आहे. त्या संबंधीची माहीती घेवून माजी विद्यार्थांनी आपल्या शाळांना गतवैभव प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करावा. या प्रयत्नातून आपल्या शाळा समृध्द कराव्या. संगणकातून माहिती मिळते, परंतू त्यामधून संस्कार मिळत नाही. यामुळे पुढील पिढीला योग्य संस्कार मिळत नाही. अश्या स्नेह मिलन सोहळ्यातून परस्पर स्नेहभाव वाढून आचार विचारांचे आदानप्रदान होत असते. या सोहळयात माजी विद्यार्थी त्यांच्या सहचारीणीह सहभागी झाले आहे. ही बाब अत्यंत गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन सोहळ्याचे प्रमुख मार्गदर्शक तथा आ. नि. महाविद्यालयातील से. नि. मराठी विभाग प्रमुख प्रा. श्रीकांत पाटील यांनी याप्रसंगी केले.

# गडचांदूरच्या शैक्षणिक विकासात आदर्श हिंदी विद्यामंदिरचे योगदान उल्लेखनीय-आ.सुभाष धोटे



**कोरपना । प्रतिनिधी**

गडचांदूर परिसरातील एकमेव हिंदी भाषिक विद्यालयाची स्थापना बहुउद्देशीय ग्रामीण विकास मंडळ, गडचांदूरच्या पुढाकारातून झाली. माणिकगड सिमेंट कंपनीच्या सहकार्याने १९९५ मध्ये गडचांदूर येथे ही स्थापना करण्यात आली. बुधवार व गुरुवारी विद्यालयात दोन दिवसीय रोप्य महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवाचे उद्घाटन शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. अध्यक्षस्थानी आमदार सुभाष धोटे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून अल्ट्राटेक सिमेंट गडचांदूरचे युनिट हेड अतुल कन्सल, मुकेशजी गहलोत, नवीन कौशिक, संस्थेचे सचिव बाळासाहेब मोहितकर, नगराध्यक्ष सविता टेकाम, संचालक विठ्ठल थिपे, वामन मत्ते, अशोक जीवतोडे, नगरसेवक पाप्पया पोन्नमवार, विक्रम येरणे, राहुल उमरे, रऊफ खान वजीर खान, सचिन भोयर, खिर्डीचे उपसरपंच दिपक खेकारे, संतोष महाडोळे, प्रभाकर पारखी, मुख्याध्यापिका डॉ. मंजुषा मत्ते यांची उपस्थिती होती. रौप्य महोत्सवी कार्यक्रमात विद्यालयाच्या विविध क्षेत्रात कार्यरत २५ माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मुकेश गहलोत, सचिव बाळासाहेब मोहितकर, ज्येष्ठ शिक्षक देवप्रकाश पोतदार यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विभिन्न स्पर्धेत विजयी ठरलेल्या माता-पालकांचा, कुस्ती स्पर्धेत विभागावर नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचा, शालेय क्रीडा बौद्धिक व सांस्कृतिक स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापिका डॉ. मंजुषा पंकज मत्ते लिखित स्वातंत्र्य सेनानी जानकीबाई आपटे एक असाधारण व्यक्तिमत्व या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. मंजुषा मते यांनी केले. संचालन पुरुषोत्तम निब्रड व अनंत काळे यांनी तर आभार राकेश गोरे यांनी मानले.

# ..अन त्यांचे पन्नास हजार रुपये परत मिळाले

**तळोधी (बा )**-एका शिक्षकाला अनोळखी मोबाईल क्रमांकावरून एस बि आय रिवार्ड संदर्भात संदेश प्राप्त झाला.आणि त्यांनी क्लिक करून विचारलेली माहिती भरली असता त्यांच्या खात्यातील ५० हजार रुपये उडविले असल्याचा संदेश प्राप्त होताच त्यांची फसगत झाल्याची घटना नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.) येथील नवोदय विद्यालयातील शिक्षकाबाबत दि.२ फेब्रुवारी रोज शुक्रवारी घडली.


सायबर अपराधात फसगत झालेल्या शिक्षकाचे नाव भारत महादेव झाडे असे आहे.या घटनेची तक्रार तळोधी पोलिसात दाखल होताच कारवाई दरम्यान ती सारी रक्कम परत मिळवून देण्यास तळोधी पोलिसांना यश आले.

> नागरिकांनी मोबाईलवर प्राप्त होणाऱ्या अनोळखी संदेशाला प्रतिसाद देऊ नये.व बक्षीसांचे आमिष दाखविणाऱ्या संकेत स्थळावर जाऊ नये.फसगत झाल्यास तात्काळ पोलीस स्टेशनला कळवावे. रक्कम परत मिळू शकते.
> **अजितसिंग देवरे,पोलीस निरीक्षक, तळोधी पोलीस स्टेशन,तळोधी (बा.)**

तळोधी येथील नवोदय विद्यालयाचे शिक्षक भारत झाडे यांना शुक्रवारी एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून एस. बी.आय.रिवार्ड संदर्भात संदेश मिळाला.त्यांनी त्यात विचारलेली सर्व माहिती भरताच त्यांच्या खात्यातून ५० हजार रुपये उडविले असल्याचे त्यांच्या लक्षात आले असता.त्यांनी तात्काळ तळोधी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली.कारवाई दरम्यान तळोधी पोलिसांनी सदर बँकेच्या नोडल अधिकाऱ्यांना ५० हजार रुपयांचे ट्रांजेक्शन थांबवून सदर रक्कम मूळ खात्यात वळती करण्याबाबत इमेल केला.आणि दि.४ फेब्रुवारी रोज रविवारला भारत झाडे यांना त्यांचे पैसे परत मिळाले.या बाबत त्यांनी तळोधी पोलिसांचे आभार मानले आहे.ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली तळोधी पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजितसिंग देवरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## वच्छालाबाई पांडुरंग ठाकरे यांचे निधन

**कोरपना** - तालुक्यातील कवठाळा येथील गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक डॉ. अरविंद ठाकरे व सेवानिवृत्त कृषी अधिकारी नंदकिशोर ठाकरे यांच्या आई वच्छालाबाई पांडुरंग ठाकरे यांचे सोमवारी सकाळी ७.३० वाजता वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या ९२ वर्षाच्या होत्या. कवठाळा येथील शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंड व बराच मोठा परिवार आहे.



## समृद्धीवर स्कार्पिओचा टायर फुटून अपघात एक ठार

**पुलगाव**-नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर पुलगाव जवळ स्कार्पिओ गाडी क्रमांक एम एच ४९ बीबी ०३४९ या गाडीचा टायर फुटून अपघात झाला या अपघातात सुमनबाई रघुनाथराव राजुरकर व ७४ वर्ष राहणार वार्ड क्रमांक पाच यवतमाळ यांचा मृत्यू झाला.

पुणे येथील सत्संग कार्यक्रमासाठी नागपूर येथील मानव सेवा उधान समिती आश्रम मधील चार महिला व चालक हे जात असताना समृद्धी महामार्गावरील नागपूर मुंबई लेंनवरील पुलगाव हद्दीतील पेट्रोल पंपा जवळील चॅनल नंबर ८२/१ येथे गाडीच्या चालकाच्या बाजूचा मागचा टायर फुटल्याने गाडीतील सर्वजण जखमी झाले यातील सुमनबाई राजूरकर यांना जखमी अवस्थेत रुणालयात नेत असताना वाटेतच त्यांचे निधन झाले ही घटना दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली अधिक तपास पुलगाव पोलीस करीत आहे.

# केंद्रीय सागरी संस्थांसोबतच्या करारामुळे राज्याच्या मत्स्योत्पादन वाढ व निर्यातीला चालना-मंत्री मुनगंटीवार

## भारतीय कृषि संशोधन परिषद च्या विविध संस्थांसमवेत मत्स्यव्यवसाय विभागाचा सामंजस्य करार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विकास साठी येथे खूप मोठ्या संधी आहेत. या क्षेत्रात काम करण्याऱ्या केंद्रीय संस्थांबरोबर केलेल्या सामंजस्य करारामुळे राज्याच्या सागरी, निमखारेपाणी व भूजल क्षेत्रातील मत्स्योत्पादन वाढ व निर्यातीला चालना मिळेल, असे प्रतिपादन राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ६ फेब्रुवारी ला महाराष्ट्रातील निमखारे मत्स्यशेती विकासासाठी भौगोलिक सर्वेक्षण प्रकल्पाचे उद्घाटन मंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मत्स्य व्यवसाय संदर्भात काम करण्याऱ्या संस्थांसोवत सामंजस्य करारही करण्यात आला. मत्स्यव्यवसाय आयुक्त डॉ. अतुल पाटणे, कांदळवन कक्षाचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव, भा.कृ.अनु.प.,सीबा,चेन्नईचे निदर्शक डॉ.कुलदीप लाल,सहआयुक्त मत्स्य (निपास) यु.आ.आगले, वरिष्ठ वैज्ञानिक डॉ.जयंती, डॉ.मोनिका कवळे, डॉ.पानीप्रसाद, डॉ.अशोक कुमार, डॉ. अर्पिता शर्मा, अजय नाखवा आदींची यावेळी उपस्थिती होती. मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, सध्या आपल्या राज्याचा सागरी मत्स्य उत्पादनामध्ये देशात ६ वा तर क्रमांक व भूजल मत्स्य उत्पादनामध्ये १७ वा क्रमांक आहे. पूर्वी दुर्लक्षित असलेला हा विभाग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र विभागाचा दर्जा देऊन ३ हजार कोटी रुपयांचा निधी ३० हजार कोटी रुपयांपर्यंत नेला. त्यामुळे या क्षेत्रात मूलभूत काम होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.मत्स्यशेती संदर्भात विविध संशोधन संस्थांमध्ये संशोधन होत असते. ते संशोधन मच्छिमार आणि नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजे. तरच त्या संशोधनाचा खऱ्या अर्थाने लाभ सर्वांना होऊ शकेल, असे सांगून मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, राज्यातील मत्स्य विकासासाठी या सर्व संस्थांनी मिळून काम केले तर राज्याची या क्षेत्रातील निर्यात २० टक्क्यांपर्यंत वाढू शकेल. त्यादृष्टीने आता काम व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, पर्यावरण संतुलनासाठी या क्षेत्राच्या अनुषंगाने जे बदल आहेत, ते केले गेले पाहिजेत. त्यासाठी नियमांचा अडथळा येणार नाही, असेही मंत्री मुनगंटीवार यांनी नमूद केले. यावेळी मंत्री मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत सागरी, निमखारेपाणी व भूजल क्षेत्रातील मत्स्योत्पादन वाढ व निर्यातीला चालना मिळण्याकरीता भारतीय कृषि संशोधन परिषद च्या विविध संस्थांसमवेत मत्स्यव्यवसाय विभागाने सामंजस्य करार केले. यामध्ये केंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्थान, चेन्नई , केंद्रिय मात्स्यिकी शिक्षण संस्थान , केंद्रीय गोडेपाणी मत्स्य संवर्धन संस्था या संस्थांचा समावेश आहे. केंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्थान, चेन्नई बरोबर झालेल्या करारानुसार महाराष्ट्रातील निमखारे मत्स्य शेतीच्या विस्तारासाठी भौगोलिक सर्व्हेक्षण दापचरी, जि. पालघर येथे आशियाई सीबास या माशाची मिनी-हॅचरीची स्थापना करणे निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रकल्प, आसनगांव, ता. डहाणू, जि. पालघर येथे खाऱ्या पाण्यातील मत्स्यपालन (काळुंदर, खेकडा, जिताडा, मिल्क फिश) पथदर्शक प्रकल्प उभारणे. बाडापोखरण, ता. डहाणू, जि. पालघर येथे एकात्मिक कोळंबी बीज उत्पादन केंद्र उभारणे. मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे वन्य पी. इंडिकस कोळंबी प्रजनक संकलन केंद्र आणि बीज उत्पादन केंद्र स्थापना करणे. महाराष्ट्राच्या तटीय जिल्ह्याच्या किनारीभागात निमखाऱ्या पाण्यातील पिंजरा पध्दतीने मत्स्यपालन उभारणी करणे, जे.एन.पी.टी., शेवा, नवी मुंबई येथे जलचर प्राणी संसर्गरोध केंद्र आणि रोग निदान प्रयोगशाळाची स्थापना करणे, महाराष्ट्राच्या तटीय जिल्ह्यांमध्ये जिताडा, काळुंदर आणि मिल्क फिश या माशांची नर्सरी संगोपन केंद्र स्थापन करणे, महाराष्ट्राच्या तटीय जिल्ह्यात खेकडा पेटी/बॉक्स संगोपन केंद्र उभारणे आदींबाबत काम केले जाईल.मत्स्यव्यवसाय विषयक विविध विषयांचे लघु कालावधीच्या विकसीत अभ्यासक्रम तयार करणे. मत्स्यबीज प्रमाणन व मत्स्यबीज केंद्र प्रमाणिकरण प्रक्रिया राबविण्याकरीता पाणी तपासणी व मासळी रोगनिदान तपासणी करणे. सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत सरदार सरोवर जलाशयाचे सर्व्हेक्षण, महाराष्ट्रातील भूजलाशयीन क्षारपट क्षेत्राचे सर्व्हेक्षण मत्स्य कातडीबाबतचे तंत्रज्ञान विकसित करणे आदींबाबत काम होणार आहे. केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिकीसंस्थान, कोची बरोबर झालेल्या करारानुसार विघटनशील मासेमारी जाळी विकसित करणे, मासेमारी नौकांसाठी पर्यायी इंधन व्यवस्था विकसित करणे, समुद्रामधील वापरात नसलेले, हरवलेले, फेकून दिलेल्या जाळ्यांचे मुल्यांकन करणे, संपूर्ण महाराष्ट्रातील मच्छीमारांकरिता व उद्योजकांकरिता कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करणे आदी कामे केली जाणार आहेत. चंद्रपूर येथे प्रादेशिक संशोधन केंद्र स्थापन, केंद्रीय सागरी मात्स्यिकी संशोधन संस्था चा करारानुसार सांख्यिकी सर्व्हेक्षण, केंद्रीय मीठ आणि सागरी रसायन अनुसंधान संस्थान, गुजरात च्या करारानुसार समुद्री शैवाल संवर्धनासाठी उपयुक्त क्षेत्राचे सर्व्हेक्षण, मासळीच्या कातडीपासून शोभिवंत वस्तू तयार करणे आदींबाबत काम होणार आहे. यावेळी मंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते राज्याचे मत्स्य बोटुकली अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने मत्स्यबीज प्रमाणीकरण व मत्स्यबीज केंद्रांचे प्रमाणन एकूण १६ केंद्रांना मत्स्यबीज प्रमाणीकरण प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तसेच यावेळी केंद्र भाडेपट्टीने देण्याकरिता सुधारित शासन निर्णयाचे अनुषंगाने एकूण १८ केंद्र भाडेपट्टीने देण्यात आली आहेत. त्यापैकी वीर मत्स्य बीज संवर्धन केंद्रास कार्यालयीन आदेश व करारपत्र वितरणही करण्यात आले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .